# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २०/०९/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ

---

### घरफोडीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे कुही अंतर्गत मौजा पाचगाव येथे दि. १९/०९/२०२४ चे वेळ ०१.०० वा. ते ०३.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— शंकर महादेव साठवने वय ५८ वर्ष रा. पाचगाव जि. नागपुर यांना माहिती मिळाली की, जिल्हा मद्यवर्ती सहकारी बॅंक शाखा पाचगाव बॅंकेच्या आतमधील रूमचे लॉक तुटलेल्या स्थितीत आहे. व कॅशीअर रूमचे सामान अस्तव्यस्त असुन रूम मधील लाखडी आलमारीचे दार तोडुन लोखंडी तिजोरी बाहेर काढलेली दिसली. तिजोरीची पाहनी केली असता तिजोरी व्यवस्थित दिसली. तिजोरी तुटली नाही बॅंकेची पाहनी केली असता कोणतीही वस्तु चोरीला गेली नाही. तसेच पोलीसांना एक संशयीत चार चाकी स्विफ्ट डिझायर वाहन क्र. एम एच ३१ सी ८९७७ ही मिळालेली असुन विधीसंघर्ष बालक सुध्दा दिसुन आला. त्याला विचारपुस केली दरम्यान त्याने आपल्या साथीदारांसह सदरचा गुन्हा केल्याचे कबुली दिली. आरोपी १) मुकेश २) नरेश महीलागे ४) प्रदिप उर्फे दादु सर्व रा. नागपुर यांचेंविरूद्ध कलम ३३१(४), ३०५, ६२, ३(५),भा.न्या. सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोनि भानुदास पिदुरकर, सपोनि इंगोले, सफौ संजय कानडे, पोहवा दिलीप लांजेवार, पोअं आशिश खराबे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर